तात्काळ/गोपनीय

क्रमांक: पीएवाय-१२८४/१९६०/[३४७१]-ई-२

महसूल व वन विभाग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : 27 MAY 1985

कोकण विभाग 1 JUN 1985 आवक ९५५८

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त

विषय :- उपजिल्हाधिकारी/तहसिलदार या संवर्गातील अधिका-यांना अत्युत्कृष्ट कामाबाबत १९८४-८५ या वर्षासाठी आगाऊ वेतनवाढी देण्याबाबत.

उपजिल्हाधिकारी आणि तहसिलदार या संवर्गामधील अधिका-यांना अत्युत्कृष्ट कामाबाबत आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्याबाबतचे १९८४-८५ या वर्षाचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाला ३१ ऑक्टोबर १९८५ पर्यंत पाठवावयाचे आहेत. म्हणून आपण याबाबतचे आपले प्रस्ताव या विभागाला उशिरात उशिरा म्हणजे ३१ ऑगस्ट १९८५ पर्यंत पाठविणे आवश्यक आहे म्हणजे त्यांची छाननी करुन हे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाला विहित मुदतीत पाठविणे शक्य होईल.

२. १९८३-८४ या वर्षासाठी आपण पूर्वी पाठविलेल्या प्रस्तावांची छाननी केल्यावर त्यामध्ये या विभागास आढळून आलेल्या पुढील त्रुटी आपल्या निदर्शनास आणण्यात येत आहेत :-

[१] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१०८१/सीआर-८१, आठ, दिनांक २० जून १९८१ नुसार मंत्रालयाबाहेरील विभाग प्रमुखांच्या कार्यालयांमध्ये काम करणा-या सेवकांना अत्युत्कृष्ट कामाबाबत आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्याबाबतचे प्रस्ताव मंत्रालयातील संबंधित प्रशासकीय विभागांना सामान्य प्रशासन विभागाकडे दरवर्षी ३१ ऑक्टोबर पर्यंत पाठवावे लागतात. तत्पूर्वी हे प्रस्ताव शासन परिपत्रक, सामान्य प्रशासनविभाग, क्रमांक एसआरव्ही-१०७८/सीआर-११/७९, आठ, दिनांक २९ एप्रिल १९८० नुसार विभागीय समितीपुढे विचारार्थ ठेवावे लागतात. त्यावर विभागीय समितीने केलेल्या शिफारशींना विभागाच्या सचिवांनी मान्यता दिल्यानंतरच हे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाला पाठविण्यात येतात. त्यामुळे विभागीय आयुक्तांचे प्रस्ताव दरवर्षी ३१ ऑगस्ट पर्यंत या विभागाकडे सादर करण्यात आले तरच विहित मुदतीत ते प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाला पाठविणे शक्य होते. तथापि वारंवार स्मरणपत्रे, अर्ध-शासकीय पत्रे, तारा इत्यादि पाठवूनही विभागीय आयुक्तांकडून प्रस्ताव वेळेवर पाठविले गेले नाहीत. त्यामुळे हे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाला पाठविण्यास यावर्षी ६ महिन्यांचा विलंब झाला आहे.

कृ. मा. प.

[२] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-१०७७/ सीएन्-१२७-७९/आठ, दिनांक ४ डिसेंबर १९७९ च्या परिच्छेद २ [५]नुसार रुपये ९१०-१२०० या असुधारित अथवा रुपये ६८०-१५०० या सुधारित वेतनश्रेणीत अथवा या वेतनश्रेणीच्या टप्प्यात [ segment ] वेतन घेणारे वर्ग-१ मधील अधिकारीच अत्युत्कृष्ट कामाबाबत आगाऊ वेतनवाढी मिळण्यास पात्र आहेत. तथापि हे आदेश लक्षात न घेता रुपये ११००-५०-१५५०-७५-१७५० या वेतनश्रेणीत वेतन घेणा-या निवड श्रेणी उपजिल्हाधिका-यांनाही आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्याच्या शिफारशी काही आयुक्तांनी केल्या आहेत.

[३] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१०७२-डी दिनांक ११ फेब्रुवारी १९७४ नुसार ३ वर्षे ज्या शासकीय सेवकांचे काम अत्युत्कृष्ट असल्याचे आढळून आले त्यांना एक आगाऊ वेतनवाढ व ५ वर्षे ज्यांचे काम अत्युत्कृष्ट असल्याचे आढळून आले त्यांना दोन आगाऊ वेतनवाढी देता येतात. त्यामुळे एखाद्या विशिष्ट पदावर तीन वर्षे काम केल्याशिवाय शासकीय सेवक आगाऊ वेतनवाढ मिळण्यास पात्र होत नाही. तथापि काही आयुक्तांनी ज्यांची तहसिलदार म्हणून तीन वर्षे सेवा झालेली नाही अशा तहसिलदारांना तहसिलदारांच्या वेतनश्रेणीत आगाऊ वेतनवाढी देण्याच्या व उपजिल्हाधिकारी म्हणून ३ वर्षे सेवा न झालेल्या उपजिल्हाधिका-यांना उपजिल्हाधिका-यांच्या वेतनश्रेणीत आगाऊ वेतनवाढी देण्याच्या शिफारशी केल्या आहेत.

[४] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१०८०/१३३३/ सीएन-११८/आठ, दिनांक २५-९-१९८० च्या परिच्छेद २ [१] नुसार संबंधित अधिका-यांना खालच्या वेतनश्रेणीत आगाऊ वेतनवाढी देण्याच्या शिफारशी करताना अशा अधिका-यांच्या वरच्या पदावरील बढत्या या परिच्छेदात निर्दिष्ट केलेल्या अटीप्रमाणे विशिष्ट कालावधीतच व्हाव्या लागतात. तथापि या अटीची ज्यांच्या बाबतीत पूर्तता होत नाही अशा अधिका-यांनाही खालच्या पदावर आगाऊ वेतनवाढी देण्याच्या शिफारशी करण्यात आल्या आहेत.

३. वर उल्लेखिलेल्या त्रुटी १९८४-८५ चे प्रस्ताव पाठविताना लक्षात घेऊन सर्व विभागीय आयुक्तांनी त्यांचे प्रस्ताव या विभागास दिनांक ३१ऑगस्ट १९८५ पर्यंत पाठवावेत अशी त्यांना विनंती आहे.

अ. ग. अंतरकर

[ अ. ग. अंतरकर ]
शासनाचे उपसचिव